# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३ ] सोमवार, एप्रिल १२, २०१०/चैत्र २२, शके १९३२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ९

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . पृष्ठे १-३

दिनांक ६ एप्रिल २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ एप्रिल २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९५८ चा मुंबई ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** या अधिनियमास, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव.**

१९५८ चा मुंबई ६०. **२.** मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६ मधील परंतुकातील "दहा रुपयांहून" या मजकुराऐवजी "शंभर रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल. **सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ६ ची सुधारणा.**

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० या मध्ये कलम १०क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०ब नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

लेखप्रमाणकाने रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरावयाची शुल्के.

"**१०क.** कलम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लेखप्रमाणक अधिनियम, १९५२ अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी लेखप्रमाणक नेमण्यात आला असल्यास, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्याला सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी देय असलेले शुल्क कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे भरता येईल आणि लेखप्रमाणक संलेखांवर पुढीलप्रमाणे पृष्ठांकन करील :— १९५२ चा ५३.

"पावती/चलान क्रमांक ....................., दिनांक .......................अन्वये रुपये .................... एवढे मुद्रांक शुल्क *रोखीने/दर्शनी धनाकर्षाद्वारे/प्रदानादेशाद्वारे *शासकीय कोषागार/उप कोषागार, ................................./ प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे भरण्यात आले.

लेखप्रमाणकाची मुद्रा. लेखप्रमाणकाची दिनांकासह सही.

* लागू नसेल ते खोडावे. ".".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ मधील, खंड (१) मधील परंतुकातील " संलेखाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत अर्ज करता येईल " या मजकुरानंतर, पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

" किंवा जागेच्या संबंधात वाद असल्यास, अपुरी वित्तव्यवस्था असल्यास, मान्य केलेल्या प्रतिफलाच्या शर्तीवरून वाद असल्यास, किंवा बेकायदेशीर बांधकाम केल्याचे नंतर आढळून आल्यास किंवा अन्य कोणतेही वस्तुस्थितीजन्य तथ्य दाबून ठेवल्यास या कारणांवरून असा करार नोंदणीकृत रद्द विलेखाद्वारे रद्द करण्यात आल्यास, अशा नोंदणीकृत रद्द विलेखाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत अर्ज करता येईल ".

५. मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये, अनुसूची ३६अ मधील, खंड (अ) च्या परिच्छेद (१) मध्ये,– सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

(क) नोंद (अ) मधील, स्तंभ २ मधील, " सातशे पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " सहाशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) नोंद (ब) मधील, स्तंभ २ मधील, " एक हजार पाचशे रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार दोनशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) नोंद (क) मधील, स्तंभ २ मधील, " तीन हजार रुपये " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ११(३)] सोमवार, एप्रिल १२, २०१०/चैत्र २२, शके १९३२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक २४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Stamp (Amendment) Act, 2009 (Mah. Act No. V of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT NO. V OF 2010.

*[First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 12th April 2010].*

An Act further to amend the Bombay Stamp Act, 1958.

Bom. LX of 1958. WHEREAS it is expedient further to amend the Bombay Stamp Act, 1958, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :—

1. This Act may be called the Bombay Stamp (Amendment) Act, 2009. Short title.

Bom. LX of 1958. 2. In section 6 of the Bombay Stamp Act, 1958 (hereinafter referred to as "the principal Act"), in the proviso, for the words "ten rupees" the words "one hundred rupees" shall be substituted. Amendment of section 6 of Bom. LX of 1958.

Insertion of section 10C in Bom. LX of 1958.

**3.** After section 10B of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Duties to be paid in cash, or by demand draft or by pay order by notary.

" **10C.** Notwithstanding anything contained in section 10, in case of the notary appointed under the Notaries Act, 1952, for the whole or any part of the State of Maharashtra, the duty payable for performing the functions entrusted to him under any law for the time being in force, may be paid by him by way of cash, or by demand draft or by pay order, in any Government Treasury or Sub-Treasury or General Stamp Office, Mumbai and the notary shall make an endorsement on the instrument as follows, namely :— 53 of 1952.

Stamp Duty of Rs. ............ paid* in cash/by demand draft/by pay order, *vide* * Receipt/Challan No. ........................, dated the ...................., in * Government Treasury/Sub-Treasury Office at ................../the General Stamp Office, Mumbai.

Seal of the notary. Signature of the notary with date.

*Strike out whatever is not applicable. ".

Amendment of section 48 of Bom. LX of 1958.

**4.** In section 48 of the principal Act, in clause (*1*), in the proviso, after the words " the date of the Instrument ", the following portion shall be added, namely :—

" or where such agreement is cancelled by a registered cancellation deed on the grounds of, dispute regarding the premises concerned, inadequate finance, financial dispute in terms of agreed consideration, or afterwards found to be illegal construction or suppression of any other material fact, the application may be made within two years from the date of such registered cancellation deed ".

Amendment of Schedule I of Bom. LX of 1958.

**5.** In SCHEDULE I appended to the principal Act, in article 36A, in clause (*a*), in paragraph (*1*),—

(*a*) in entry (*A*), in column 2, for the words " Seven hundred fifty rupees " the words " Six hundred rupees " shall be substituted ;

(*b*) in entry (*B*), in column 2, for the words " One thousand five hundred rupees " the words " One thousand two hundred rupees " shall be substituted ;

(*c*) in entry (*C*), in column 2, for the words " Three thousand rupees " the words " Two thousand rupees " shall be substituted.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI